साप्ताहिक

# परळी परिसर

✻ परळी वैजनाथ ✻ सोमवार, दि. १० जून २०२४ ✻ पाने-४ ✻ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

## नरेंद्र मोदींनी रचला इतिहास; पंतप्रधानपदाची तिसऱ्यांदा घेतली शपथ

नवी दिल्ली (बातमीदार):-

नवी दिल्ली येथे रविवारी (दि.१०) राष्ट्रपती भवन परिसरात झालेल्या भव्य कार्यक्रमात नरेंद्र मोदी यांनी सलग तिसऱ्यांदा देशाचे १५ वे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या विक्रमाची बरोबरी श्री मोदी यांनी करुन इतिहास रचला आहे.

श्री मोदी यांच्यासह त्यांच्या मंत्रिमंडळातील ७२ सहकाऱ्यांना मंत्रिपदाची व गोपनियतेची शपथ राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दिली. या शपथ विधी सोहळयास देश आणि विदेशातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधान श्री मोदी यांच्यासह ३० कॅबिनेट आणि ४२ राज्यमंत्री अशा एकूण ७२ जणांना शपथ दिली. या मंत्रिमंडळात महाराष्ट्रातून २ कॅबिनेट आणि ४ राज्य



मंत्र्यांचा समावेश आहे. या मंत्रिमंडळात ६ महिलांना स्थान देण्यात आले आहे.

यावेळी राजनाथ सिंह, अमित शहा, नितीन गडकरी, जे.पी. नड्डा, शिवराज सिंह चौहान, निर्मला सितारमन, एस.जयशंकर, मनोहरलाल खट्टर, एच.डी कुमारस्वामी, पियुष गोयल, धर्मेंद्र प्रधान, जीतनराम मांझी आदी मिळून ३० जणांनी कॅबिनेट मंत्री पदाची शपथ घेतली.

महाराष्ट्रातून श्री गडकरी, श्री गोयल यांच्यासह रक्षा खडसे, रामदास आठवले, प्रतापराव जाधव यांचा नव्या मंत्रिमंडळात समावेश झाला आहे. या शपथ विधी सोहळ्यास देश-विदेशातील मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्रातून मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजितदादा पवार आदी मान्यवर उपस्थित होते. ✻✻✻

## ज्ञानराधाच्या कुटेला १३ जूनपर्यंत कस्टडी

माजलगाव (बातमीदार):- ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीमध्ये मागील अनेक ठेवीदारांच्या ठेवी ठेवून शाखा बंद करणाऱ्या सुरेश ज्ञानोबा कुटे यास बीड शहर पोलिसांनी अटक केली होती. यानंतर शुक्रवारी संध्याकाळी सहा वाजता माजलगाव न्यायालयात त्यास हजर केले असता न्यायालयाने १३ तारखेपर्यंत पोलीस कस्टडी सुनावली आहे.

बीड येथील ज्ञानराधा मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या महाराष्ट्रातील अनेक शाखांमधून मोठ्या प्रमाणावर ठेवी ठेवण्यात आल्या होत्या. त्या ठेवी मिळत नसल्यामुळे माजलगाव तालुक्यातील ठेपेगाव येथील बालासाहेब पांडुरंग ढेरे या वृद्ध शेतकऱ्यांसह १६ खातेदारांनी फिर्यादीवरून ३० मे रोजी माजलगाव पोलिसात ज्ञानराधा मल्टीस्टेटकडे ७४ लाख २४ हजार १३७ रुपयांच्या ठेवी परत मिळत नसल्यामुळे गुन्हा दाखल केला होता.यात बालासाहेब पांडुरंग ठेरे यांची यांचे ७ लाख २५ हजार ६१३ रुपये अडकलेले आहेत. बीड पोलिसांनी सुरेश कुटे यास अटक केल्यानंतर माजलगाव शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. यानंतर येथील ग्रामीण रुग्णालयात मेडिकल केल्यानंतर संध्याकाळी सहा वाजता येथील न्यायालयात हजर करण्यात आले.येथील जिल्हा न्यायालय २ चे न्यायमूर्ती बी.जी. धर्माधिकारी यांनी त्यांची बाजू ऐकुन घेत १३ जुन पर्यंत पोलीस कोठडी सुनावली.यावेळी सरकारी वकील अँड.पी.एन.मस्कर यांनी काम पाहिले. यावेळी न्यायालय परिसरात अनेक ठेवीदार हजर होते त्यामुळे पोलीस बंदोबस्त मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आला होता.✻

## सकल ओबीसी समाजाच्या वतीने परळीत कडकडीत बंदला मोठा प्रतिसाद

परळी वैजनाथ, (बातमीदार):- भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे यांच्याबद्दल सोशलमिडियावर आक्षेपार्ह पोस्ट केल्याच्या निषेधार्थ रविवारी (दि.९) सकल ओबीसी समाजाच्या वतीने परळी शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला.

सकाळपासूनच कार्यकर्ते बाजारपेठेत दुचाकीवर फिरत बंदचे आवाहन करत होते. या बंदला व्यापाऱ्यांनीही प्रतिसाद देत आपली दुकाने बंद ठेवली. दिवसभर बाजारपेठ कडकडीत बंद होती. या शिवाय हॉटेल, पानटपऱ्या यांसह रस्त्यावरील दुकाने बंद होती.



यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय झाली. या प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करुन गुन्हे दाखल करावेत अशी मागणीही करण्यात आली. कार्यकर्त्यांनी विविध मागण्यांचे निवेदन पोलिसांना दिले. ✻✻

## महाराष्ट्रात काँग्रेस नं. १ तर बीड मध्ये बजरंग बप्पांच्या विजयाने इतिहास घडवला-बहादूरभाई

परळी वैजनाथ, (बातमीदार):- संविधान बदलून पाहणार्या व सर्व सामान्य जनतेला महागाईच्या खाईत ओठणा- या भुलभुलया मोदी सरकारला भारताच्या बहारदार जनतेने धडा शिकवला असुन खा.सोनिया गांधी,राहुल गांधी यांच्यावर ठाम विश्वास ठेवला आहे. महाराष्ट्राच्या जनतेने काँग्रेस पक्षाला प्रचंड साथ देत १३ खासदार देऊन महाराष्ट्रात काँग्रेस पक्षाला नं. १ पक्ष बनवले आहे तर बीड लोकसभेला महाविकास आघाडीच्या बजरंग बप्पांच्या विजयानी इतिहास घडवला असल्याची प्रतिक्रिया परळी काँग्रेसचे शहराध्यक्ष बहादुरभाई यांनी यावेळी दिली.

बीड लोकसभेचा निकाल घोषित होताच परळी काँग्रेस पक्षाच्या नेते कार्यकर्ते पदाधिकारी यांनी पक्ष कार्यालय,शहरातील प्रमुख चौकात फटाक्यांची अतिषबाजी पेढे वाटुन या विजयाचा आनंदोत्सव साजरा केला. याप्रसंगी शहराध्यक्ष बहादुरभाई माध्यमाशी बोलताना म्हणाले कि, बीड जिल्ह्यातील जनतेने महाविकास आघाडीच्या बजरंग बप्पा सोनवणे यांना आशीर्वाद देऊन खासदार केले. यामुळे जिल्ह्यात परिवर्तनाची नांदी ठरली असुन येणार्या काळात ही काँग्रेस पक्षा बरोबर च जनता राहिल असा विश्वास व्यक्त करत



बहादुरभाई पुढे म्हणाले काँग्रेस पक्षाने मोदी सरकार कसे सर्वसामान्याचे नाही, महागाई, बेरोजगारी, संविधान विरोधी आहे हे अनेक अभियानाच्या माध्यमातून घरोघरी जाऊन जनजागृती अभियानाच्या माध्यमातून सांगितले यासाठी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्तानी मेहनत घेतली. ती यामाध्यमातुन यशस्वी झाली असल्याचे दिसून आले आहे. देशात कोणत्या एका पक्षा सत्तेत बसण्याची संधी जनतेने दिली नाही. अपेक्षा आहे काँग्रेस पक्षाच्या नेतृत्वाखाली असलेल्या इंडिया आघाडीने सरकार स्थापन करावे आणि एकदाचे हे मोदी शहाला घरी बसवावे असे बहादुरभाई म्हणाले. यावेळी जेष्ठ नेते प्रकाशराव देशमुख, कार्य अध्यक्ष शशिशेखर चौधरी, उपाध्यक्ष एहेतेशाम खतीब, सुभाषराव देशमुख, वैजनाथ गडेकर, विधानसभा अध्यक्ष रंजीत देशमुख, अल्पसंख्याक अध्यक्ष रसुल खान, अनुसूचित जाती अध्यक्ष दिपक सिरसाट, ओ.बी.सी.शहर अध्यक्ष जावेदभाई शेख, अल्ताफ शेख, सदाम परवकते, बदरभाई, शेख फारोख, गुलाब देवकर, संमदर खान आदी उपस्थित होते.

# आपला सामाजिक सलोखा आणि सौहार्द जपायची जबाबदारी प्रत्येक जिल्हावासीयांची - ना.धनंजय मुंडे

मुंबई (जि.मा.का.):- बीड जिल्ह्यात लोकसभा निवडणूक अत्यंत वेगळ्या वळणावर व अनेक मुद्द्यांनी गाजून पार पडली. अतिशय वेगळ्या वातावरणात झालेल्या या निवडणुकीत झालेला पराजय आम्ही मोकळ्या मनाने स्वीकारला; विजयी उमेदवाराचे अभिनंदन सुद्धा केले. मात्र अजूनही सोशल मीडियावर जातीवाचक व विविध नेत्यांची अवहेलना करणाऱ्या पोस्ट केल्या जात असून याद्वारे सामाजिक सलोखा बिघडून आपसातील द्वेष व तणाव वाढत आहे. त्यामुळे आपला सामाजिक सलोखा व सौहार्द जपण्याची जबाबदारी आता प्रत्येक बीड जिल्हा वासीयांची आहे, असे आवाहन जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज व्हीडिओ संदेशद्वारे केले आहे.

क्या हार मे, क्या जीत में, किंचित नही भयभीत मै। स्व. अटल बिहारी वाजपेयी यांच्या या कवितेप्रमाणे मी व पंकजाताईंनी अत्यंत जिव्हारी लागणारा हा पराभव मान्य केला आहे. लोकशाहीमध्ये जनतेचा कौल हा महत्त्वाचा असतो आणि तो कौल आपण मान्य करून विजयी उमेदवारास शुभेच्छा देखील दिलेल्या आहेत.



मात्र सोशल मीडियावर अजूनही आमच्यासारख्या नेत्यांचे फोटो आणि बनावट व्हिडिओ पोस्ट करून वातावरण दूषित केले जात आहे अत्यंत खालच्या भाषेत राजकीय नेत्यांवर टीका करणाऱ्या पोस्ट तसेच जाती-जातीत तेढ निर्माण करणाऱ्या पोस्ट व्हायरल केल्या जात आहेत. महायुती व महाविकास आघाडीच्या दोन्हीकडच्या कार्यकर्त्यांना माझी विनंती आहे, की हे आता थांबलं पाहिजे. असंही धनंजय मुंडे यांनी म्हटलं आहे. मी बीड जिल्ह्याचा पालकमंत्री असल्याने नियमानुसार मतमोजणी प्रक्रियेत किंवा मतमोजणी केंद्राच्या जवळपास सुद्धा उपस्थित नसताना मी बंदूक काढली किंवा कोणाला मारहाण केली अशा पद्धतीच्या खोट्या पोस्ट जाणीवपूर्वक पेरल्या जात आहेत. या गोष्टीत अजिबात तथ्य नसून या गोष्टी पूर्णपणे खोटारड्या व जाणीवपूर्वक बदनामी करणाऱ्या आहेत. अशा गोष्टी पेरल्याने काय साध्य होणार आहे, असा प्रश्नही धनंजय मुंडे यांनी उपस्थित केला आहे.

३५० वर्षांपूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्याला १८ पगड जातींना एकत्र घेऊन गावगाडा चालवायची शिकवण दिली, आज त्या शिकवणी पासून परावृत्त न होता, आपला गावगाडा व आपली सामाजिक एकतेची परंपरा अबाधित ठेवणे हे सर्व जिल्हा वासीयांचे आद्य कर्तव्य असल्याचेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे. ***

# बीड जिल्हयाच्या जनतेचा आशीर्वाद शरदचंद्रजी पवार साहेबावरच-सुदामतीताई गुट्टे

परळी वैजनाथ (बातमीदार):- बीड जिल्ह्याच्या जनतेचा आशीर्वाद नेहमीच शरदचंद्रजी पवार साहेबावरच आहे हे बजरंगबप्पा सोनवणे यांच्या विजयाने दाखवून दिले आहे असे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी येथे केले.

जेष्ठ नेते शरदचंद्रजी पवार साहेबाना राजकारणात रोखण्यासाठी भाजपने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या माध्यमातून पक्ष फोडून आपल्याशी केले. परंतु महाराष्ट्रातील जनता खऱ्या अर्थाने कोणाच्या बाजूने आहे हे या निवडणुकीने दाखवून दिले. बीड जिल्ह्यातही केवळ आ.संदिप क्षीरसागर व आमच्या सारखे



सर्वसामान्य कार्यकर्ते साहेबावर प्रेम करणारे मावळे सोडता पक्ष फोडाफोडीत जिल्ह्यातील साहेबांच्या आशीर्वादाने मोठे झालेले अनेक आमदार पक्षाला व साहेबांना सोडून गेले होते. या संकटाच्या काळात बीड मध्ये काय होईल हे कोणी सांगू शकत नव्हते. परंतु खा.शरदचंद्रजी पवार साहेबांवर प्रेम करणारे व आमच्या सारखे मावळे राष्ट्रवादी काँग्रेससोबत राहून शेतकरीपूत्र बजरंगबप्पा सोनवणे यांना या निवडणुकीत यश मिळवून दिले आहे. या विजयात जिल्ह्यातील महाविकास आघाडीतील काँग्रेस, उध्दव बाळासाहेब ठाकरे शिवसेना गट व मित्र पक्षाची मोठी साथ मिळाली असे सांगून परळी विधानसभा मतदारसंघात या निवडणुकीत दहशत निर्माण करून बुथ ताब्यात घेऊन बोगस मतदान केल्याचा आरोप त्यांनी केला. या यशाबद्दल परळी मतदारसंघातील बहादर जनतेचे धन्यवाद व्यक्त करुन सौ.सुदामतीताई गुट्टे यांनी आभार मानले.*

## बीड लोकसभा निवडणुकीतील उमेदवारांना मिळालेली मते

| उमेदवार | गेवराई | माजलगाव | बीड | आष्टी | केज | परळी | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पंकजा गोपीनाथराव मुंडे (भाजप) | ९५४०९ | १०५६४८ | ७७५८३ | १४५२१० | १०९३६० | १४१७७४ | ६७४९८४ |
| बजरंग मनोहर सोनवणे (नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार) | १३४५०५ | १०४७१३ | १३९२६४ | ११२९८९ | १२३१५८ | ६६९४० | ६८१५६९ |
| डॉ. सिध्दार्थ राजेंद्र टाकणकर (बहुजन समाज पार्टी) | ८८८ | ९८७ | ७८९ | ७९० | ९०९ | ७२५ | ५०८८ |
| अशोक भागोजी थोरात (बहुजन महा पार्टी) | १०९८२ | ९११७ | ८२१२ | ९०११ | ९८०७ | ७५७४ | ५४७८३ |
| अशोक सुखदेव हिंगे (वंचित बहुजन आघाडी) | ८२३३ | ११७३० | ६६८७ | ३६०८ | ११४९२ | ८९८३ | ५०७३३ |
| करुणा धनंजय मुंडे (स्वराज्य शक्ती सेना) | ३६२ | ३०८ | २१४ | २३० | २६३ | २१६ | १५९३ |
| चंद्रकांत कुमार हजारे (महाराष्ट्र विकास आघाडी) | १७४ | १४१ | ९० | ९४ | १७२ | १२७ | ७९८ |
| जावेद सलीम सय्यद (टीपू सुल्तान पार्टी) | २०४ | २०७ | १२७ | १२२ | १८१ | १३० | ९७१ |
| ताटे महेंद्र अशोक (आंबेडकरिस्ट रिपब्लिकन पार्टी) | १०८ | १२१ | ६१ | ६८ | ७६ | ९७ | ५३१ |
| ॲड. माणिक बन्सी आदमाने (बहुजन रिपब्लिकन सोशलिस्ट पार्टी) | ७५ | ६५ | ४६ | ३३ | १०७ | ९८ | ४२४ |
| ॲड. शरद बहिणाजी कांबळे (ऑल इंडिया नॅशनल रक्षा सेना) | ८९ | ७७ | ७१ | ४९ | ६४ | ४२ | ३९२ |
| शेषेराव चोखोबा वीर (प्रबुद्ध रिपब्लिकन पार्टी) | १०४ | १२० | ७४ | ७३ | ९७ | ६९ | ५३७ |
| कस्पटे गणेश व्यंकटराव (अपक्ष) | १५४ | १३६ | ८४ | ९६ | १२१ | १२६ | ७१७ |
| ॲड. गणेश नवनाथराव करांडे (अपक्ष) | २९९ | २९८ | २५५ | २४० | २६३ | १५० | १५०५ |
| गफ्फारखान जब्बारखान पठाण (अपक्ष) | ४९३ | ४८७ | ४७२ | ४९३ | ३७७ | २३८ | २५६० |
| गोकुळ बापूराव सवासे (अपक्ष) | ५९७ | ४९६ | ३७८ | ५०८ | ३०९ | २८४ | २५७२ |
| जावेद सिकंदर मोमीन (अपक्ष) | ६२२ | ५१४ | ३४१ | ४२१ | ४१४ | ३४८ | २६६० |
| दत्ता सुदाम गायकवाड (अपक्ष) | ४४१ | ३५९ | ३८२ | ४०६ | ३२० | २२१ | २१२९ |
| नाजेम खान जब्बार खान पठाण (अपक्ष) | ५२९ | ४४१ | ३८० | ४८५ | ४७२ | २७५ | २५८२ |
| प्रकाश भगवानराव सोळंके (अपक्ष) | १७७ | २३३ | १०४ | १०३ | १६७ | १०१ | ८८५ |
| भास्कर बन्सीधरराव खांडे (अपक्ष) | ८४ | ८५ | ५८ | ४८ | ५३ | ६२ | ३९० |
| मुबीन जुबेरी जहीर उल अफाक (अपक्ष) | १५८ | १२८ | १०६ | ७६ | ११३ | ९३ | ६७४ |
| मुस्तफा मैनोद्दीन शेख (अपक्ष) | १४५ | १२२ | ६७ | ६७ | ६४ | ६६ | ५३१ |
| रहेमान बाहोद्दीन सय्यद (अपक्ष) | ८५ | ७८ | ५२ | ४९ | ७५ | ४४ | ३८३ |
| राजेंद्र अच्युतराव होके (अपक्ष) | १०५ | १२१ | ४२ | ३९ | ७० | ५० | ४२७ |
| लक्ष्मीबाई बाजीराव मोरे (अपक्ष) | ९४ | ८६ | ५९ | ४२ | ४७ | ५४ | ३८२ |
| वचिष्ट उध्दव कुटे (अपक्ष) | १०१ | ८८ | ६३ | ४४ | ६२ | ५५ | ४१३ |
| वसीम शेख सलीम शेख (अपक्ष) | १४२ | १३२ | ९१ | ६६ | ७७ | ७१ | ५७९ |
| शितल शिवाजी घोंडरे (अपक्ष) | ३१३ | २९२ | १९३ | १४५ | २१७ | १४० | १३०० |
| शेख एजाज शेख उमर (अपक्ष) | १२७ | १३४ | ७१ | ७५ | ८९ | ५४ | ५५० |
| शेख तौसिफ अब्दुल सत्तार (अपक्ष) | १९१२ | १८१७ | १८१८ | ११७८ | १५१८ | १२२४ | ९४६७ |
| शेख याशेद शेख तय्यब (अपक्ष) | ३०४ | २४१ | २०२ | १९६ | १६१ | १५२ | १२५६ |
| डॉ. श्रीराम विठ्ठलराव खळगे (अपक्ष) | ३६४ | २८७ | १८० | २४३ | २४७ | १९० | १५११ |
| सतीष पद्माकर कापसे (अपक्ष) | ४१० | ४०६ | ३६४ | ३७० | ३२१ | २२५ | २०९६ |
| समशेरखान साहेबखान पठाण (अपक्ष) | १०११ | ९१२ | ६८५ | ७२८ | ८६५ | ५०० | ४७०१ |
| सय्यद मिनहाज अली (अपक्ष) | ६७ | ६३ | ५० | ४२ | ५२ | ३६ | ३१० |
| सलाउद्दीन खान पठाण (अपक्ष) | १५५ | १६१ | ७८ | १०४ | १२३ | १०३ | ७२४ |
| सलीम अल्लाबक्ष सय्यद (अपक्ष) | ४५ | ५६ | ३८ | २६ | ४४ | २८ | २३७ |
| सादेक इब्राहीम शेख (अपक्ष) | ३० | ७१ | २४ | २२ | ३१ | २८ | २०६ |
| सुलेमान खैरोद्दीन महमद (अपक्ष) | ९३ | १०६ | ७२ | १०० | ७७ | ७४ | ५२२ |
| हिदायत सादेख अली सय्यद (अपक्ष) | ९२ | ८० | ८१ | ६९ | ६७ | ५९ | ४४८ |
| वरीलपैकी एकही नाही (नोटा) | ३१८ | २८५ | ३६३ | ३०४ | ४०४ | ३९२ | २०६६ |
| एकूण | २६०६०० | २४२०२९ | २४०३७१ | २७९०६२ | २६२९०६ | २३२२१८ | १५१७१८६ |

वरील आकडेवारीमध्ये टपाली मतदानाचा समावेश नाही.



## संपादकीय...

# बीडकरांच्या अपेक्षा पूर्ण व्हाव्यात...

**–० सुविचार ०–**

**गर्व व अहंकार हे माणसाचे मोठे शत्रू आहेत..!**

यंदाची बीड लोकसभेची निवडणूक खूप गाजली. या निवडणुकीने सबंध महाराष्ट्राचे लक्ष वेधले. २००९ पासून म्हणजे गेल्या १५ वर्षापासून श्री मुंडे कुटुंबियांकडे एकहाती असलेली जिल्ह्याची सत्ता आता बदलली आहे. मोठ्या चुरशीच्या व प्रतिष्ठेच्या झालेल्या या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे बजरंगबप्पा सोनवणे बीड जिल्ह्याचे नवे खासदार झाले आहेत. त्यांच्या या विजयाने जिल्ह्यातील समर्थक कार्यकर्ते, श्री पवार यांना मानणारे जिल्ह्यातील नागरिक तसेच श्री सोनवणे निवडून आलेल्या महाविकास आघाडीचे नेते, कार्यकर्ते या सर्वांना मोठा आनंद झाला आहे. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या तरुण मुलाला बीडकरांनी जिल्ह्याचा खासदार होण्याची मोठी संधी दिली आहे. गेल्या निवडणुकीत पराभूत झालेले श्री सोनवणेही या यशामुळे आनंदीत झाले आहेत. गेल्या काही निवडणुकीत जिल्ह्याची खासदारकी भाजपच्या ताब्यातून काढून घेण्यासाठीही पक्षीय राजकारणात मोठे प्रयत्न झाले. या निवडणुकीत त्यांचे हे प्रयत्न यशस्वी झाल्याने वरिष्ठ मंडळीही खुष झाली आहेत.

बीड जिल्ह्यात केज, धारूर, अंबाजोगाई पट्टयातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या सोयीसाठी बजरंगबप्पा सोनवणे यांनी साखर कारखाना उभा केला. हा कारखाना यशस्वीपणे चालवून व उसाला चांगला भाव देवून एक त्यांनी आदर्श निर्माण केला आहे. यामुळे श्री सोनवणे यांना मानणारा मोठा वर्ग जिल्ह्यात आहे. शेतकरी, कष्टकऱ्यांसाठी धडपडणारा तरुण कार्यकर्ता म्हणून बजरंगबप्पाची ओळख आहे. श्री सोनवणे बीड जिल्ह्याचे नवे खासदार झाल्यामुळे त्यांच्याकडून जिल्हावासीयांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. जिल्ह्याच्या मागासलेपणाचा कलंक दूर व्हावा, केंद्र व राज्य सरकारकडून विविध विकास योजना जिल्ह्यात याव्यात असे सर्वांना वाटते. गेल्या कितीतरी वर्षापासून सुरू असलेल्या नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामाला मोठी गती मिळावी व काम पूर्ण होवून रेल्वे धावावी ही अपेक्षा व स्वप्न इथल्या तमात जनतेचे आहे. या शिवाय सोलापूर-बीड-छत्रपती संभाजीनगर, घाटनांदूर-अंबाजोगाई हा नवा रेल्वे मार्ग व्हावा अशी मागणी आहे. यामुळे बीड जिल्ह्याच्या विकासाला चालना मिळेल. परळी हे बीड जिल्ह्यातील एकमेव मोठे रेल्वे स्टेशन आहे. येथून मुंबईला व तिरूपती बालाजीसाठी थेट रेल्वे सेवा सुरू व्हावी अशी इथल्या नागरिकांची गेल्या अनेक वर्षापासूनची मागणी आहे. जिल्ह्यातील बेरोजगारांना काम मिळावे म्हणून जिल्ह्यात विविध भागात केंद्र सरकारच्या माध्यमातून किमान दोन-तीन तरी मोठे प्रकल्प यावेत असे अनेकांना वाटते. जिल्ह्यात बीड-आष्टी-नगर तसेच परळी-तेलगाव या रस्त्याचे काम सध्या सुरू आहे. या कामाला गती मिळावी म्हणून खासदार या नात्याने लक्ष घालावे, या शिवाय धारूर-तेलगाव मार्गावरील घाटात सतत अपघात होतात. या मार्गाचे रूंदीकरण व्हावे अशी मागणी आहे. जिल्ह्यात सिंचनाचे क्षेत्र वाढावे, कृषी प्रक्रिया उद्योग सुरू व्हावेत, बीडला वैद्यकिय महाविद्यालय सुरू व्हावे, प्रत्येक तालुक्यात औद्योगिक वसाहती स्थापन व्हाव्यात, परळीत जुन्या औष्णिक वीज निर्मिती केंद्राच्या जागेवर सौरउर्जा प्रकल्प कार्यान्वित व्हावा, जिल्ह्यात विमानतळ व्हावे, परळी वैजनाथ या तीर्थक्षेत्राचा केंद्र सरकारच्या 'प्रसाद' योजनेत समावेश व्हावा, येथे येणाऱ्या भाविकांसाठी या योजनेतून विविध सेवा-सुविधा उपलब्ध व्हाव्यात ही मागणी आहे. त्या बरोबरच श्री वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाचा केंद्र सरकारच्या सूचीमध्ये 'ज्योतिर्लिंग' म्हणून समावेश व्हावा अशा विविध मागण्या व विकास प्रश्न इथले आहेत. या बरोबरच नागरी सुविधा, सामाजिक सुरक्षा, शिक्षण, आरोग्य, वीज, रस्ते, पाणी आदी प्रश्नांची सोडवणूक व्हावी या अपेक्षा बीड जिल्ह्यातील नागरिकांच्या आहेत. खासदार म्हणून श्री सोनवणे यांनी यात लक्ष घालावे ही भावना इथे आहे. ***

# स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिन 'शिवराज्याभिषेक'

पारतंत्र्य हे कोणी कोणावर लादू शकत नाही तर स्वतःच स्वतःवर लादलेली मानसिक गुलामगिरी असते. अशा अवस्थेमध्ये समाज भेदरून जातो, स्वतःला दास, गुलाम समजतो. अशावेळी समाजाच्या मनामध्ये आत्मविश्वास जागृत करून स्वातंत्र्याची प्राणप्रतिष्ठा भरण्याचे कार्य करतो तोच महापुरुष म्हणून उदयाला येतो. मध्ययुगीन भारतीय इतिहासामध्ये असेच झाले होते. भले भले सरदार विदेशी शाह्यांची चाकरी करण्यात धन्यता मानत होते.त्यावेळी कोणी भारतवंशी स्वतंत्रराज्य निर्माण करू शकतो, राजा होऊ शकतो हा विचारही कोणी करु शकत नव्हते. ही अशक्यप्राय वाटणारी गोष्ट छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुढाकाराने आणि जीवाला जीव देणाऱ्या सहकार्यामुळे शक्य झाली. शिवाजी राजे छत्रपती शिवाजी राजे झाले.

१९ फेब्रुवारी १६३० रोजी शिवरायांचा जन्म झाला. काही काळ महाराष्ट्रात गेल्यावर ते शहाजी राजेकडे बेंगलोरला गेले. त्या ठिकाणी वेगवेगळ्या प्रकारचे प्राथमिक शिक्षण पूर्ण करून पुन्हा महाराष्ट्रात आगमन केले. वापस येताना शहाजीराजांनी शिवरायांना सोबत भगवाध्वज, राजमुद्रा आणि विश्वासू कारकून तसेच राज्यकारभार चालवण्यासाठी धनही दिले. जिंकलेल्या प्रत्येक किल्ल्यावर भगवा ध्वज, राज्यकारभाराच्या प्रत्येक पत्रावर शिक्का म्हणून राजमुद्रा कामाला आली. राजमुद्रा ही शहाजीराजांनी शिवरायांना दिलेले एक उद्दिष्ट होते-

''प्रतिपच्चंद्रलेखेव
वर्धिष्णुर्विश्ववंदिता शाहसुनोः शिवस्यैषा
मुद्रा भद्राय राजते''

प्रतिपदेच्या चंद्राच्या रेषेप्रमाणे वाढत जाणारे शहाजीपुत्र शिवाजी यांचे राज्य विश्वाला वंदनीय आहे. या उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी शिवाजी महाराज प्रयत्नशील राहिले.शिवरायांची अनेक साधुसंतावर श्रद्धा होती. त्यातील देहूचे साधु संत तुकाराम महाराज यांचे कीर्तन ऐकण्यासाठी जिजाऊ तसेच शिवराय जात असत.तुकारामांनी सैनिकांना प्रेरणा देणारे पाईकीचे अनेक अभंग रचले आहेत.

***''पाईकपणे ज्योतीला सिद्धांत***
***शूर धरी मात वचन चित्ती...!!''***

राजमुद्रा आणि तुकोबांचा अभंग हेच खऱ्या अर्थाने शिवरायांचे छत्रपती बनण्यामागचे प्रेरणा स्त्रोत आहेत. रायरेश्वराच्या मंदिरातील शपथ ते राज्यभिषेक यात अनेक घडामोडी शिवरायांच्या जीवनात घडलेल्या आहेत. शिवराय खानदानी परंपरेने राजे होतेच परंतु त्यांनी राज्याभिषेक का केला असेल यामागची कारणे जाणून घेणे आवश्यक आहे.

**१.समाज मान्यता:** शिवरायांनी राज्याभिषेक करण्यामागे समाज मान्यता हे महत्त्वाचे कारण आहे.त्यांनी राज्य स्वकर्तुत्वाने मिळवले होते. लोक त्यांना



राजे समजतही होते परंतु लोकांच्या मनात शिवराय म्हणजे एक जहागीरदार यांचा मुलगा, काहींच्या मनात बंडखोर अशी काहीअंशी धारणा होती. ती धरणा पुसून त्याऐवजी स्वतंत्र राज्याचा राजा अशी पक्की लोकधारणा तयार व्हावी यासाठी राज्याभिषेक होणे महत्त्वाचे होते.

**२.धार्मिक अधिष्ठान:** तत्कालीन समाजावर धर्माचा मोठा पगडा होता.आज एकविसावे शतक आहे तरी तो कमी झालेला नाही. त्याकाळी अधिकृत राजा होणे हे राज्याभिषेक केल्याखेरीज शक्य नव्हते.म्हणून तशी धार्मिक मान्यता मिळवणे यासाठी राज्याभिषेक विधी होणे महत्त्वाचे वाटत असावे.

**३.राजमान्यता:** मुघलशाही, आदिलशाही, कुतुबशाही, इंग्रज, डच, पोर्तुगीज या विदेशी सत्ता त्याकाळी देशांमध्ये राज्य करीत होत्या.तसेच अनेक मांडलिक सत्ता, देशी राजे यांचेही राज्य देशांमध्ये होते. या सर्व देशी-विदेशी सत्तांकडून समानतेची,बरोबरीची वागणूक किंवा मान्यता मिळावी यासाठी राज्यभिषेक होणे महत्त्वाचे होते.

**४.राजदंड :** राज्याभिषेक झाल्याखेरीज, हातात राजदंड असल्याखेरीज धार्मिक बाबींचे निर्णय देता येणार नाहीत ही पंडितमान्य बाब होती. त्यामुळे हाती राजदंड येण्यासाठी राज्याभिषेक महत्वाचा विधी होता.

थोडक्यात समाज, धर्म, इतर सत्ता यांच्याकडून मनातून, अधिकृत मान्यता मिळवणे हे राज्यभिषेक करण्यामागचे कारण असावे. शिवरायांनी राज्याभिषेकाचा आपला मनोदय व्यक्त केला आणि खळबळ उडाली. महाराष्ट्रातून धर्मपंडितांचा याला विरोध होऊ लागला. राज्याभिषेकासाठी एकही पंडित पुरोहित महाराष्ट्रात मिळाला नाही. शेवटी काशी येथील गागाभट नावाच्या संस्कृत पंडिताने पांडित्य करण्याचे मान्य केले. रायगडावर सर्व व्यवस्था करण्यात आल्या. पन्नास हजारापेक्षा जास्त लोक राज्याभिषेक प्रसंगी गडावर होते. देशी विदेशी सत्तांचे दूत नजराणे घेऊन आले होते. अत्यंत मंगलमय वातावरणात जिजाऊंच्या डोळ्यादेखत ६ जून १६७४ रोजी शिवराज्याभिषेक पूर्ण झाला. राजे शिवाजी क्षत्रिय कुलावतंस सिंहासनाधीश्वर छत्रपती शिवाजी महाराज झाले. स्वराज्यातील प्रत्येक किल्ल्यावर तोफांची अतिषबाजी करण्यात आली. पारतंत्र्यातील भारताला कलाटणी देणारी घटना, स्वातंत्र्याची प्रेरणा देणारी घटना रायगडावर घडली. आजही त्या प्रेरणेचा झरा वाहतो आहे.

सध्या आम्ही कोणाचे व कसे गुलाम आहोत याचा शोध आणि बोध घेऊन त्या गुलामगिरीतून मुक्त होण्याचा प्रयत्न केला पाहिजे. शिवरायांच्या नावाचा केवळ जयजयकार करून काहीच उपयोग होणार नाही. आपण केवळ नाव घेत गेलो आणि कृतिशून्य बनलो तर शिवराय काय म्हणतील ?एक कवी आपल्या सुंदर कवितेमध्ये म्हणतो-

***'' सुगंध सारा वाटत गेलो***
***मी कधी दरवळलो नाही***
***ऋतू नाही असा कोणता***
***ज्यात मी होरपळलो नाही***
***साथ न सोडली कधी सत्याची***
***खोटयात मी मळलो नाही***
***सारे सोडून गेले मला***
***मी कुणाला कळलो नाही''***

६ जून म्हणजे स्वातंत्र्याची प्रेरणा देणारा दिन आहे. स्वातंत्र्याचा खरा अर्थ समजून घेणे हेच शिवरायांना खरे अभिवादन असेल.चला तर मग पारतंत्र्याला झुगारून देऊया आणि मनातून स्वतंत्र होऊया.....!!

**- श्रीकृष्ण उबाळे,** बीड

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)

RNI No.-MAHMAR/2017/74640 Post Reg.No.L/174/RNP/Beed/2023-25 (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) www.parliparisar.com

# या ‘बजरंगा’ ची ‘कमाल’ बीडच्या राजकारणात केली ‘धमाल’!

**सबंध महाराष्ट्राचे लक्ष लागलेल्या व मतमोजणीच्या शेवटच्या फेरी पर्यंत उत्सुकता ताणल्या गेलेल्या बीड लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे उमेदवार बजरंगबाप्पा सोनवणे यांनी महायुतीच्या उमेदवार व भाजपच्या ज्येष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे यांचा सुमारे साडे सहा हजार मतांनी पराभव करुन जिल्ह्याच्या राजकारणात कमाल करत मोठी धमाल उडवली आहे. ही निवडणूक सहज घेणाऱ्या भाजप व महायुतीच्या मित्र पक्षाना या विजयामुळे चांगलीच चपराक बसली आहे. जिल्ह्याच्या राजकारणात अशीच परिस्थिती कायम राहिल्यास येत्या काळात होणाऱ्या विधानसभेसह इतर निवडणुकीत चित्र बदलायला वेळ लागणार नाही.**



चांगले काम, मोठे सामाजिक पाठबळ व जिल्ह्याच्या राजकारणात प्रभाव असतानाही विद्यमान खासदार डॉ.प्रितम मुंडे यांना या लोकसभेची उमेदवारी डावलून परळी विधानसभेच्या निवडणुकीत पराभूत झालेल्या व राजकीय वीजनवासात असलेल्या ज्येष्ठ नेत्या पंकजाताई मुंडे यांना भाजपने बीड लोकसभेची उमेदवारी दिली. जिल्ह्यातील बीड वगळता इतर सर्व विधानसभा व विधान परिषदेतील विद्यमान आमदार, लोकसभेतील खासदार या सर्वांनी पंकजाताईंना या निवडणुकीत निवडून आणण्यासाठी मोठी शक्ती व आपली प्रतिष्ठा लावली. पंकजाताई मुंडे यांनीही या निवडणुकीत विजयी होण्यासाठी आपली सर्व शक्तीपणाला लावली. उमेदवारी जाहीर झाल्यामुळे निवडणुकीच्या कितीतरी दिवस अगोदर मागचे नैराश्य झटकून मोठ्या उत्साहात श्रीमती मुंडे यांनी आपला धडाक्यात प्रचार सुरू केला. जिल्ह्याच्या गावा-गावात, वाडी, वस्ती, तांड्यावर जाऊन मतदारांच्या थेट भेटी घेत, त्यांच्याशी संवाद साधत कार्यकर्त्यांना कामाला लावले. पंकजाताई मुंडे यांचा प्रचार सुरू होऊनही त्यांच्या विरोधात उमेदवार कोण? याचा घोळच सुरू होता. रोज नव-नवी नावे चर्चेत येत होती. शेवटी महाविकास आघाडीन गेल्या लोकसभा निवडणुकीत डॉ.प्रितम मुंडे यांच्याकडून पराभूत झालेले व गेल्या पाच वर्षात केज वगळता जिल्ह्यातील मतदारांशी फारसे संपर्कातही नसलेले, जिल्ह्याच्या विकास प्रश्नाबाबत कोणताही तीव्र संघर्षही न केलेले बजरंगबाप्पा सोनवणे यांना उमेदवारी दिली. त्यांच्या साखर कारखान्यामुळे केज, अंबाजोगाई, धारुर पटट्यात शेतकऱ्यांच्या ते संपर्कात होते. एवढीच त्यांची जमेची बाजू होती. बीड लोकसभेची उमेदवारी मिळवताना त्यांनी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटातून शरद पवार गटात उडी घेतली.

वंचित बहुजन आघाडीकडून अशोक हिंगे यांना उमेदवारी मिळाली त्यामुळे ही निवडणूक जिल्ह्यात तिरंगी होईल असे सुरूवातीला वाटले. शिवाय दोन्ही मराठा उमेदवार असल्याने मत विभागणी होऊन भाजपला सहज यश मिळेल असे गणितही मांडले गेले. या निवडणुकीत जसा जसा रंग भरत गेला तस तशी चुरसही वाढली. शेवटच्या टप्प्यात श्री सोनवणे विरुद्ध पंकजाताई मुंडे अशीच लढत झाली. विकासाचे मुद्दे बाजूला पडत जातीचे राजकारणच निवडणुकीत घोळ घालत राहिले व शेवटपर्यंत ते कायम राहिले.

प्रचाराला मिळालेला अपुरा वेळ, कमी असलेले कार्यकर्त्यांचे पाठबळ आमदार संदीपभैय्या क्षीरसागर, काँग्रेसच्या खा.रजनीताई पाटील वगळता जिल्ह्याच्या राजकारणातील कोणतेही तगडे नेते सोबत नाहीत. निवडणुकीसाठी लागणारी पुरेशी यंत्रणा व ‘बळ’ नाही, असे असूनही निवडणुकीत बजरंग बप्पाची चांगलीच हवा झाली. मराठा योद्धे श्री मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या आरक्षणाच्या आंदोलनाचा मोठा फायदा श्री सोनवणे यांना झाला. आरक्षणाच्या मुद्यावर एकवटलेला मराठा समाज विविध कारणामुळे सत्ताधाऱ्यांकडून दुखावला गेला होता. अंतरवाली सराटीतील लाठी हल्ला, पुढे कार्यकर्त्यांवर दाखल झालेले गुन्हे, एसआयटी चौकशी, मराठा तरुणांच्या वाढत्या आत्महत्या याचा राग समाजाच्या मनात खदखदत होता. त्यातच महायुतीतील काही नेत्यांची वक्तव्य व भूमिका या असंतोषात भर टाकत गेली. नेते, कार्यकर्त्यांवर ‘एसआयटी’ चौकशी लावल्याने आता यांची ‘कुपाटी’ लावा असा सूर अनेकजण संतापून व्यक्त करत होते तर जिल्ह्याच्या ग्रामीण भागात अनेक गावात ‘जय रामकृष्ण श्रीहरी, आता वाजवा तुतारी’ असा नारा अनेकजण देत होते. एकूणच लोकसभेच्या मागच्या तिन्ही निवडणुकीत श्री मुंडे कुटुंबाच्या पाठीशी खंबीरपणे उभा असलेला मराठा समाज यावेळी मात्र दुरावला गेला.

**✲ वार्तापत्र ✲**
**– लक्ष्मण वाकडे** (पत्रकार), परळी वैजनाथ.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची अंबाजोगाईत झालेली सभा श्री सोनवणे यांचा फायदाच करुन गेली. कर्नाटकातील सरकारने मुस्लिमांना दिलेल्या आरक्षणाचा मुद्दा व ओबीसीच्या आरक्षणाला धक्का न लावण्याच्या श्री मोदींच्या या सभेतील वक्तव्याने मुस्लिम व मराठा समाज चिडला. या समाजाने एकत्र येत मतदानातून आपला राग व्यक्त केला. पुरेसा प्रचार नसतानाही समाजानेच ही निवडणूक हातात घेतल्याने जिल्ह्यात ‘तुतारी’ वाजत गेली. त्यातच भाजप व मित्र पक्षाकडून तसेच त्यांच्या नेत्यांकडून दुखावल्या गेलेल्या समाजातील इतर घटकांनीही ‘तुतारी’च वाजवायला सुरूवात केली.

परळी विधानसभेच्या निवडणुकीतील पराभवानंतर कमी झालेला संपर्क, बीड जिल्ह्यात घटलेली पक्षाची ताकद, दुरावलेले कार्यकर्ते, राज्यात व दिल्लीत सत्ता असूनही जिल्ह्याच्या विकासासाठी विशेष काही न करता आल्यामुळे असलेली नाराजी, नगर-बीड-परळी रेल्वे मार्गाच्या कामाला नसलेली गती, बंद पडलेला वैद्यनाथ कारखाना, अनेक ज्येष्ठ नेत्यांकडे झालेले दूर्लक्ष, प्रचाराच्या भाषणातून विकास प्रश्नाबाबत दिलेली व न पटली गेलेली आश्वासने, त्यातच कार्यकर्त्यांतील मन व मतभेद या साऱ्या गोष्टीमुळे जिल्ह्यात कमळ फुलण्या ऐवजी कोमेजतच गेले. त्यातच भाजप व मित्र पक्षातील मराठा, मुस्लिम नेत्यांना त्यांच्या मतदारांनी मान दिला, परंतु मतदान कमळाला करण्याऐवजी ते ही तुतारी वाजवत गेले.

गेल्या विधानसभा निवडणुकीत व या लोकसभा निवडणुकीत पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सभा झाल्या. सभेला मोठी गर्दी झाली परंतु या सभांचा फायदा म्हणावा तसा व तेवढा भाजपला जिल्ह्यात झाला नाही. महायुतीच्या नेत्यांनी प्रचारात चंदणचोरीचा मुद्दा उपस्थित केला परंतु, तो कोणताही परिणाम या निवडणुकीत दाखवू शकला नाही. उलट शरद पवार यांच्या बीड, अंबाजोगाई येथील सभेने श्री सोनवणे यांची ताकद वाढवली. अशा विविध कारणांमुळे पंकजाताई मुंडे यांची या निवडणुकीत पराभवाकडे वाटचाल होत गेली.

बीड लोकसभेची जागा सर्वसाधारण उमेदवारासाठी आहे. मागच्या तीनही निवडणुकीत भाजपने घराणेशाही जपली. यामुळे अनेकजण खदखद व्यक्त करत होते. दुसऱ्याला संधी का नाही? असा सवाल करत होते. या निवडणुकीत भाजपच्या पराभवाने गेल्या पंधरा-सोळा वर्षापासून मुंडे कुटुंबियांकडे असलेली जिल्ह्याची एकहाती सत्ता आता संपुष्टात आली.

महाविकास आघाडीतील मित्र पक्षातील नेते, कार्यकर्त्यांनी चांगली साथ बजरंगबप्पांना दिली. राजकारणातील फोडा-फोडीमुळे बदललेल्या गोष्टी व त्यामुळे राज्यातील सत्ताधाऱ्यावरील नाराजी, जेष्ठ नेते शरद पवार, शिवसेना प्रमुख उद्धव ठाकरे यांच्याबाबत वाढत गेलेली सहानुभुती याचा फायदा जिल्ह्यात महाविकास आघाडीला झाला.

तुतारी वाजवणारा माणूस व पिपाणी यांतील फरक अनेक सर्वसामान्य मतदारांना न कळल्यामुळे अनेकांनी मतदानावेळी तुतारी ऐवजी पिपाणीचे बटन दाबले. याचा मोठा फटका श्री सोनवणे यांना बसला. त्यांचे मताधिक्य सुमारे पन्नास हजाराने घटल्याचे अनेकांनी बोलून दाखवले. बीड लोकसभेची निवडणूक तुतारी (पिपाणी) चिन्हावर लढवणारे अशोक थोरात यांना चोपन्न हजारावर मते पडली आहेत. असाच प्रकार राज्यात अनेक मतदार संघात झाला आहे.

बीड जिल्ह्यातील परळी, आष्टी व माजलगाव विधानसभा मतदार संघात महायुतीचे बळ कायम आहे. तर केज, गेवराई व बीड या तीन विधानसभा मतदार संघात महाविकास आघाडीचे बजरंगबप्पा सोनवणे यांना मताधिक्य मिळाल्याने याचा होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत परिणाम होईल, असे मत जाणकार व्यक्त करत आहेत.

या लोकसभेच्या निवडणुकीत मतदानादिवशी जिल्ह्यात अनेक मतदान केंद्रावर दुपार नंतर मतदानाचा टक्का मोठ्या प्रमाणात वाढला. याबाबत आरोप, प्रत्यारोप झाले, मोठी ओरड झाली, तक्रारी केल्या गेल्या, यामुळे वाढलेल्या मताच्या टक्क्यामुळे राजकीय गणिते बिघडणार असे लोक बोलत होते. परंतु वाढलेला टक्का कुणाचा फायदा करुन गेला हे आता दिसले आहे. या प्रकारामुळे मात्र जिल्ह्याची राज्यभर चर्चा व बदनामी झाली हे नाकारुन चालणार नाही. दरम्यान, बीड जिल्ह्यात मागच्या अनेक दशकांपासून ज्येष्ठ नेते शरद पवार यांना मानणारा मोठा वर्ग आहे. या मंडळीनेही आपली श्री पवारांवरील निष्ठा ‘तुतारी’ वाजऊन या निवडणुकीत जपली आहे. शरद पवार गटाचे बजरंगबप्पा सोनवणे यांचा झालेला विजय जिल्ह्याच्या राजकारणाला नवी कलाटणी देणारा ठरणार आहे. या विजयामुळे राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते शरद पवार यांचा जिल्ह्याच्या राजकारणावर प्रभाव पुन्हा वाढणार आहे.

सर्वसामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेल्या व राजकारणाची कोणतीही पार्श्वभूमी नसतानाही ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी बजरंगबप्पा सोनवणे या शेतकरी तरुणाला बीड जिल्ह्याचे खासदार करुन भल्याभल्यांना आश्चर्याचा धक्का दिला आहे.

या निवडणुकीत परळी मतदार संघात महायुतीच्या तुलनेत महाविकास आघाडीचा प्रचार, ताकद कमी होती. मतदानादिवशीची यंत्रणाही पुरेशी नव्हती. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील वगळता मोठ्या नेत्यांच्या सभाही परळीत झाल्या नाहीत. प्रचार करणाऱ्या नेत्यांच्या गावातही तुतारीला खुप काही मोठी साथ भेटली नाही. तरीही श्री सोनवणे यांना परळी मतदार संघातून सुमारे ६७ हजार एवढी मते पडली आहेत, हे आश्चर्यच आहे. ***